Short News

# के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे रविवारी इको फ्रेंडली कार्यशाळा

नाशिक । के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक आणि स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्स्चेंज (स्माईल) व स्पीनच सेंटर ऑफ एक्सलन्स यांचे संयुक्त विद्यमाने रविवार (दि. ३) सकाळी ८ वाजता के. के. वाघ तंत्रनिकेतनच्या मैदानावर इको फ्रेंडली उपक्रमांतर्गत शाडू मातीपासून गणेशमूर्ती कार्यशाळाचे आयोजन आले आहे. कार्यशाळेस पहिली ते चौथी, पाचवी ते दहावी, कनिष्ठ- वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना के. के. वाघ फाईन आर्ट्स (ललित कला)च्या तज्ज्ञ मूर्तीकारांमार्फत शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. या आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजक अजिंक्य वाघ व प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी केले.

## महत्त्वाचे

# के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे ३ सप्टेंबरला इको फ्रेंडली कार्यशाळा

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक आणि स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्स्चेंज (स्माईल) व स्पीनच सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक ३ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता के. के. वाघ तंत्रनिकेतनच्या मैदानावर इको फ्रेंडली उपक्रमांतर्गत शाडू मातीपासून गणेशमूर्ती कार्यशाळेचे आयोजन आले आहे. कार्यशाळेस इयत्ता पहिली ते चौथी, पाचवी ते दहावी, कनिष्ठ-वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना के. के. वाघ फाइन आर्ट्स (ललित कला) महाविद्यालयाच्या तज्ज्ञ मूर्तिकारांमार्फत शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे मार्गदर्शन मिळणार आहे. पर्यावरण व संवर्धन या सामाजिक जाणिवेतून या आयोजित कार्यशाळेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजक अजिंक्य वाघ व प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी केले.

www.mymahanagar.com
आपलं महानगर | My महानगर.com

# के. के. वाघ अभियांत्रिकी ब्रह्मास्त्र क्वाड प्रथम

## राष्ट्रीय स्तरावरील आयएसएन ई सिझन ९ क्वाड स्पर्धेचे मानकरी : १३ पैकी ११ पारितोषिकांवर बाजी

**नाशिक।** भोपाळ येथे नुकतीच राष्ट्रीय स्तरावरील 'आय एस एन ई मोटरस्पोर्ट्स' या सिझन ९ क्वाड टॉर्क स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ब्रह्मास्त्र क्वाड टॉर्कच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. यामध्ये मेकॅनिकल, रोबोटिक्स, ए. आय. डी. एस. आणि इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंगच्या विभागाच्या विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग नोंदवला. स्पर्धेत भारतातील २२ संघानी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेदरम्यान ३ पारितोषिकांपैकी ११ पारितोषिके के. के. वाघच्या विद्यार्थ्यांनी पटकावली.

या स्पर्धेतील अनेक मापदंड के. के. वाघ अभियांत्रिकी संघाने यशस्वीपणे पूर्ण केले. त्यात प्रामुख्याने ट्रॅक्शन, सस्पेन्शन, एक्सीलेरेशन, एन्ड्युरन्स व फ्युएल इकॉनॉमी, मनुव्हेराबिलिटी, डिझाईन, कॉस्ट रिपोर्ट, बिझनेस प्लॅन, सी. ए. इ, व उत्कृष्ट इनोवेशन अवॉर्ड पटकावले. तसेच सर्वोत्कृष्ट महिला



म्हणून श्रद्धा तिवारी हिला सन्मानित करण्यात आले.

टिम ब्रह्मास्त्र क्वाडने वाहन तयार करताना त्याचे स्पेअर भाग जसे की, इंजिन, गिअर बॉक्स, सस्पेन्शन, चासिस, ब्रेक्स, एस्थेटिक, स्टिअरिंग मेकॅनिझम साठी आवश्यक असलेली यंत्रसामग्रीचा उपयोग महाविद्यालयाच्या वर्कशॉप मध्ये विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केले.

या स्पर्धेत सहभागी असलेले विद्यार्थी सिद्धेश हेमंतकुमार जाधव (कॅप्टन), प्रथमेश अरुण आहेर (रायडर), यश भालचंद्र जिरे, अजिंक्य प्रवीण मालपुरे, ओंकार रामदास गुळे, सिद्धार्थ पंढरीनाथ वाघ, सूचित खैरे, साईराज रापर्तीवार, अनिकेत भुसारे, रोशन उगले, सुरभी साबळे, यश पाचपुते, हर्षवर्धन देवरे, नरेंद्र पाटील, हरीश सनेर, ओंकार पठाडे, समीर सुताने, आर्या सोमवंशी, अपर्णा धारणकर, आयुष शर्मा, राहुल सावरकर, आदित्य वाघस्कर, वेदांत जाधव, अथर्व गंगलवार, वेदांत मापारी, विराज शेवाळे, रुपेंद्र गवांदे, देवेश मंडल, विवेक आहेर, भार्गव पाटील, पार्थ गडाख या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

आठ वर्षांपासून अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये भाग घेत आहेत. या स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासाठी वाहने, अवजारे बनविण्यासाठी संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर, अधिष्ठाता तथा संगणक विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एस. साने, प्रा. डॉ. पी. बी. कुशारे, प्रा. डॉ. पी. जे. पवार, प्रा. डॉ. आर. के. मुंजे, प्रा. डॉ. एन. बी. गुरुळे व वर्कशॉप स्टाफचे सहकार्य मिळते. विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सर्व संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी स्पर्धकांचे अभिनंदन केले. या स्पर्धेसाठी टीम मेंटॉर म्हणून प्रा. मोहनसिंग परदेशी व प्रा. एस. व्ही. कडभाने यांनी मार्गदर्शन केले.

AaplaMahanagar Edition
Aug 22, 2023 Page No. 11
Powered by : eReleGo.com

# राज्यस्तरीय विनाअनुदानित अभियांत्रिकी असोसिएशनच्या अध्यक्षपदी समीर वाघ

**नाशिक : प्रतिनिधी**

असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरिंग कॉलेजेस (महा) अर्थात महाराष्ट्रातील विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या असोसिएशनच्या केंद्रीय व्यवस्थापन समितीच्या विश्वस्तांची नुकतीच निवड प्रक्रिया पार पडली. या निवड प्रक्रियेत राज्यस्तरीय अभियांत्रिकी असोसिएशनच्या अध्यक्षपदी के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिकचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांची बिनविरोध निवड झाली. तर डॉ. शशिकांत अण्णाराव हलकुडे (सोलापूर) यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.

सरचिटणीसपदी अनिलकुमार गुप्ता (कोल्हापूर), सहचिटणीसपदी बब्रूवाहन रोंगे (सोलापूर) आणि





खजिनदारपदी अमित कोल्हे (कोपरगाव) यांची बिनविरोध निवड झालेली आहे. तसेच केंद्रीय व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून डॉ. सुरेश उकरंडे(मुंबई), डॉ. भावेश पटेल(मुंबई), डॉ. हरीश वणकुद्रे (ठाणे), डॉ. प्रमोद विटकर(पुणे), ॲड. नीलिमा गुजर (बारामती), डॉ. व्यंकट श्रीनिवास शास्त्री पसुमर्ती (पुणे), गोरख देशमुख (सोलापूर), अनिल बागणे (कोल्हापूर), सारिका पाटील (सांगली), गुलाबराव देवकर (जळगाव), प्रीतम रायसोनी (जळगाव), सुभाष देवरे (धुळे), डॉ. उल्हास शिऊरकर (औरंगाबाद), डॉ. उल्हास शिंदे (औरंगाबाद), शांतीसागर बिरादार (जालना), अंकुशराव कदम (नांदेड), दिलीप इंगोले (अमरावती), डॉ. श्रीकांत चेंडके (अमरावती), डॉ. अनिल खर्चे (बुलढाणा), डॉ. प्रमोद पांपटवार (नागपुर), शीतल वाटीले (यवतमाळ), अमित यरगुडे (चंद्रपूर), शालिनीताई विखे-पाटील (अहमदनगर ) आणि ॲड. सुशांत पाटील (पुणे) यांची बिनविरोध निवड झालेली आहे.

या सर्व व्यवस्थापन समितीच्या विश्वस्त व सदस्य यांची निवड पुढील पाच वर्षासाठी अर्थात मे २०२८ पर्यंत असेल, अशी माहिती असोसिएशनने एका पत्रान्वये दिलेली आहे.

देशदूत

# विनाअनुदानित अभियांत्रिकी असोसिएशन अध्यक्षपदी वाघ

**नाशिक | दि. ९ प्रतिनिधी**

असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरिंग कॉलेजेस अर्थात महाराष्ट्रातील विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय असोसिएशनच्या केंद्रिय व्यवस्थापन समितीच्या विश्वस्तांची नुकतीच निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी राज्यस्तरीय अभियांत्रिकी असोसिएशनच्या अध्यक्षपदी के.के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ तर डॉ. शशिकांत हलकुडे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.

सरचिटणीसपदी अनिलकुमार गुप्ता,





सहचिटणीसपदी बब्रूवाहन रोंगे आणि खजिनदारपदी अमित कोल्हे यांची बिनविरोध निवड झाली आहे. तसेच केंद्रीय व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून डॉ. सुरेश उकरंडे, डॉ. भावेश पटेल, डॉ. हरीश वणकुद्र, डॉ. प्रमोद विटकर, अॅड. निलिमा गुजर, डॉ. व्यंकट श्रीनिवास शास्त्री पसुमर्ती, गोरख देशमुख, अनिल बागण, सारिका पाटील, गुलाबराव देवकर, प्रितम रायसोनी, सुभाष देवरे, डॉ. उल्हास शिऊरकर, डॉ. उल्हास शिंद, शांतीसागर बिरादार, अंकुशराव कदम, दिलीप इंगोल, डॉ. श्रीकांत चेंडके, डॉ.अनिल खर्चे, डॉ. प्रमोद पांपटवार , शितल वाटील, अमित वरगुड, शालिनीताई विखे-पाटील आणि अॅड. सुशांत पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे.

या सर्व व्यवस्थापन समितीच्या विश्वस्त व सदस्य यांची निवड पुढील पाच वर्षांसाठी अर्थात मे २०२८ पर्यंत असेल अशी माहिती असोसिएशनने एका पत्रान्वये दिलेली आहे.

[redacted]

# 'विनाअनुदानित अभियांत्रिकी'च्या अध्यक्षपदी समीर वाघ यांची निवड

## धुळ्याचे देवरे, जळगावचे देवकर, रायसोनी सदस्य

नाशिक, ता. ९ : महाराष्ट्रातील विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय असोसिएशनच्या केंद्रीय व्यवस्थापन समितीच्या विश्वस्तांची निवड नुकतीच झाली. यात राज्यस्तरीय अभियांत्रिकी असोसिएशनच्या अध्यक्षपदी नाशिकच्या के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांची, तर उपाध्यक्षपदी सोलापूरचे डॉ. शशिकांत अण्णाराव हलकुडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सरचिटणीसपदी अनिलकुमार गुप्ता (कोल्हापूर), सहचिटणीसपदी बभ्रुवाहन रोंगे (सोलापूर) आणि खजिनदारपदी अमित कोल्हे (कोपरगाव) यांची बिनविरोध निवड झाली. केंद्रीय व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून डॉ. सुरेश उकरंडे (मुंबई), डॉ. भावेश पटेल (मुंबई), डॉ. हरीश वणकुद्रे (ठाणे), डॉ. प्रमोद वितकर (पुणे), अॅड. नीलिमा गुजर (बारामती), डॉ. व्यंकट श्रीनिवासशास्त्री पशुमर्ती (पुणे), गौरव देशमुख (सोलापूर), अनिल वाघणे (कोल्हापूर), सारिका पाटील (सांगली), गुलाबराव देवकर (जळगाव), प्रीतम रायसोनी (जळगाव), सुभाष देवरे (धुळे), डॉ. उल्हास शिऊरकर (छत्रपती संभाजीनगर), डॉ. उल्हास शिंदे (छत्रपती संभाजीनगर), शांतीसागर बिरादार (जालना), अंकुशराव कदम (नांदेड), दिलीप इंगोले (अमरावती), डॉ. श्रीकांत चेंडके (अमरावती), डॉ. अनिल खर्चे (बुलढाणा), डॉ. प्रमोद पांपटवार (नागपूर), शीतल वाटिले (यवतमाळ), अमित यरगुडे (चंद्रपूर), शालिनीताई विखे-पाटील (अहमदनगर) आणि अॅड. सुशांत पाटील (पुणे) यांची बिनविरोध निवड झालेली आहे.



समीर वाघ



डॉ. शशिकांत हलकुडे

असोसिएशनचे आजमितीस महाराष्ट्रातील २४९ महाविद्यालये सभासद आहेत. असोसिएशनची स्थापना २००३ मध्ये झाली. असोसिएशनच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांचे विविध प्रश्न व समस्या शासनदरबारी मांडून त्यांचे निरसन केले जात आहे. यापैकी असंख्य प्रश्न असोसिएशनचे दिवंगत संस्थापक अध्यक्ष (कै.) बाळासाहेब देवराम वाघ यांच्या नेतृत्वाखाली सुटलेले आहेत. या निवडीबद्दल असोसिएशनच्या सर्व सभासद महाविद्यालयांनी नवनियुक्त व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.